# विज्ञान केंद्रासाठी दोन कोटी रुपयांचा निधी

## मीरा-भाईंदरमध्ये पहिलेच केंद्र

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** मीरा भाईंदर पालिकेतर्फे शहरात विद्यान केंद्र तयार केले जाणार आहे. काशिमीरा येथे तयार होणाऱ्या या केंद्रात विद्यार्थांना प्रत्यक्ष वैज्ञानिक प्रयोगाची माहिती दिली जाणार असून या केंद्रासाठी शासनाकडून २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. अशाप्रकारचे हे शहरातील पहिले केंद्र असणार आहे.

वैज्ञानिक युगात मीरा भाईंदरमधील विद्यार्थांना प्रत्यक्ष विज्ञानाचे प्रयोग अनुभवता यावे. तसेच त्यामध्ये वैज्ञानिक जिज्ञासा जागावी, यासाठी पालिकेकडून काशिमीरा येथे विज्ञान केंद्राची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे केंद्र पालिकेच्या आरक्षण क्रमांक-३६४ वर उभारले जाणार आहे. साधारण ५ हजार ४०० चौरस मीटर जागा असलेल्या या आरक्षणाचा २ हजार ७ चौरस मीटर भाग हा विज्ञान केंद्रासाठी आहे. आधुनिक पद्धतीने हे केंद्र विकसित करण्यासाठी अभ्यास सुरू असल्याचे पालिकेचे शहर अभियंता दीपक खांबित यांनी सांगितले.

**विज्ञान केंद्र असे?** नव्याने तयार होणाऱ्या पालिकेच्या विज्ञान केंद्रात विद्यार्थांना प्रत्यक्ष अनुभव घेता यावा म्हणून विविध स्वरूपाचे प्रकल्प उभारले जाणार आहेत. यात ऊर्जेची निर्मिती, वातावरणातील बदल आणि त्यास कारणीभूत ठरणाऱ्या त्रुटी, अंतराळातील स्थिती आणि रॉकेटविषयी माहिती, वाहनांची कार्यशाळा, आणि इतर नव्याने येत असलेल्या वैज्ञानिक गोष्टींचा समावेश करण्यात येणार आहे. याशिवाय विद्यार्थांना या गोष्टीची माहिती देण्यासाठी विशेष सभागृह उभारले जाणार असून त्यात ३-डी विज्ञान कार्यक्रम, तारांगण, विद्यार्थी कक्ष, आणि डिजिटल वर्ग आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

लोकसत्ता
Thu, 10 November 2022
https://epaper.loksatta.com/c/70817034